# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा , भाग तिसरा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

ई साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा : भाग तिसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख



©श्री विजय पांढरे(२०१२)



**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**



प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

ज्या धृतिच्या कारणे । आत्मज्ञानाचे प्रकटणे । तिलाच मी सात्त्विक म्हणे । अर्जुना माझ्या ॥७४४॥
आता राजस धृतिचे वर्णन । अर्जुना मी करीन । लक्ष ते देऊन । ऐकावे तू ॥७४४॥
जीव शरीर होऊन । स्वर्ग संसार भोगणं । धर्म अर्थ कामात अडकणं । ती धृति राजसी ॥७४५॥
मनोरथाच्या त्या सागरी । धर्मार्थ कामाचे व्यापारी । ती राजसी धृतीची वारी । समजावी अर्जुना ॥७४६॥
सोबती जे कर्म असणे । अर्जुना ते चौपट होणे । ते राजसी धृतीच्याच कारणे । घडे अर्जुना ॥७४७॥
अर्जुना त्या धृतीस । समजावेस तू राजस । आता ऐक तू तामस । तिसरी जी का ॥७४८॥
सर्वत्र का अधमपणे । जयाचे गा रुपा येणे । कोळसा जैसे काळेपणे । प्रसिद्ध की ॥७४९॥
जे निकृष्ट आणि हीन । त्या अर्जुना म्हणणे गुण । ते तर राक्षसा सज्जन । म्हणणे तैसे ॥७५०॥
ग्रहांत सिद्ध जो पापपणे । तो प्रसिद्ध मंगळ नावाने । तैसे तमा गुण म्हणणे । आहे अर्जुना ॥७५१॥
जया अंगी सर्व दोष । ऐसी अवगुणाची मूर्ती खास । तयासीच बा तामस । म्हणती अर्जुना ॥७५२॥
तया अंगी अति आळस । जयाने पोसले पापास । म्हणून सदैव पात्र दु:खास । अर्जुना तो ॥७५३॥
देह धनाच्या आवडीकारण । तयाने सदैव भयभीत असणं । दगडास जसे कठीणपण । न सोडे कधी ॥७५४॥
मनइंद्रियांचा तो व्याप । बांधे तया आपोआप । जैसे कृतघ्ना पाप । ठेवले असे ॥७५५॥
सदैव असंतोष तयासी । असमाधानी तो अहर्निशी । म्हणौनि मैत्री तयासी । विषादे केली ॥७५६॥
व्याधी धरे अपथ्यास । लसूण न सोडी गंधास । तैसा हा विषादास । प्राप्त सदा ॥७५७॥
तारुण्य द्रव्य वासना । घालती मनी धिंगाणा । म्हणून तो माजोरीपणा । तयाच्या अंगी ॥७५८॥
उष्णता न सोडी विस्तवास । साप न विसरी डुकास । भय जसे जिवास । न सोडी कधी ॥७५९॥
जसे बा त्या मृत्यूने । शरीरा कधी न सोडणे । तैसे न सोडले मदाने । तामसा कधी ॥७६०॥
वासना इच्छा विषाद । गहन आळस आणि मद । हे पाचही राहती अखंड । तयाच्या अंतरी ॥७६१॥
ऐसे अवगुणाची खाण । ती धृति तामसी जाण । असं सांगितलं देवानं । अर्जुना तेथे ॥७६२॥
दूषित पूर्वकर्माकारण । घडे ऐसे ते आचरण । तैसे तामसी हे गुण । पूर्वकर्माकारणे ॥७६३॥
होता सूर्याचे उगवणे । घडे मार्ग तो आक्रमणे । पण आधी निश्चयाचे असणे । असावे लागे ॥७६४॥
तैसी बुद्धी कर्माते प्रकटवी । कर्म इंद्रियांसी उपजवी । परि उपजावया असावी । धीरता आधी ॥७६५॥
ते हे गा तुजप्रति । सांगितली त्रिविध धृति । ही कर्माचीच निष्पत्ती । निश्चित अर्जुना ॥७६६॥
येथे फळ एक जे उपजे । सुख जयाते म्हणिजे । तेही त्रिविध जाणिजे । कर्मवशे ॥७६७॥
तरी फळरूप ते सुख । त्रिगुणी भेदले देख । सांगतो आता चोख । व्याख्या सुखाची ॥७६८॥
चोख सांगू जाता । ती तर शब्दाचीच सत्ता । तेथे सत्याची कथा । हुकूनी जाये ॥७६९॥
म्हणून प्रकटवून अवधान । घे अर्जुना तू ऐकून । केवळ अंतरीच्या ओढीनं । समजते सारे ॥७७०॥
ऐसे म्हणून देवानं । केलं त्रिविध सुखाचं वर्णन । तयाचेच ते विवेचन । ऐकावे आता ॥७७१॥
सुखाचे प्रकार तीन । ऐकावेत तू लक्ष देऊन । म्हटला तो भगवान । तेथे अर्जुना ॥७७२॥
होता आत्मतत्त्वाची भेट । सुख जे प्राप्त होतं । त्या सुखाची बात । ऐकावी आता ॥७७३॥
जशी औषधाची गोष्ट । ते प्रमाणातच घ्यावं लागतं । वा कथलाचं रूप होतं । रसायनाकारणे ॥७७४॥
मिठाचे पाणी होण्यास । लागे चारदा शिंपडावे पाण्यास । तसा हा सारा अभ्यास । आहे अर्जुना ॥७७५॥
ज्याला सुखाची आस । त्याने करावा हा अभ्यास । होई जीवभावाचा नाश । तयाने अर्जुना ॥७७६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे जे सुख । तेही असे त्रिगुणात्मक । करून वेगळाले एकेक । सांगतो आता ॥७७७॥
जैसे चंदनवृक्षाचे बुडा । असे सर्पाचा तो वेढा । बा बोराच्या त्या झाडा । काटे जैसे ॥७७८॥
जसे जाण्या त्या स्वर्गात । करावी लागे यज्ञाची यातायात । वा असे त्या बालपणात । दुःख जैसे ॥७७९॥
जसे पेटवण्या त्या दिव्यास । लागे सहावे त्या धुरास । वा घेणे पडे औषधास । होण्या बरे ॥७८०॥
तैसे बा पांडवा । जाण्या सुखाच्या त्या गावा । मनइंद्रियांचा मेळावा । ओलांडणे पडे ॥७८१॥
स्वर्ग संसारा कंटाळून । इच्छा वासना त्यागून । होणे वैराग्य ते उत्पन्न । सूत्र अर्जुना ॥७८२॥
ऐकता ते संतवचन । प्रकटे अर्जुना अवधान । मग बुद्धीची वाट लागणं । घडे तेथे ॥७८३॥
रागद्वेष तो संपता । प्रकटते मनी समता । मग मनइंद्रियांसी तादात्म्यता । तुटून जाई ॥७८४॥
चक्रवाकांचा वियोग होणे । गायीचे वासरू दूर करणे । भिकाऱ्या ताटावरून उठवणे । दुःखद जैसे ॥७८५॥
मातेचे ते बालक । काळाने नेता एकाएक । वा माशाने सोडणे उदक । दुःखद जैसे ॥७८६॥
तैसे सोडता विषयांचे घर । दुःख होई अर्जुना थोर । तेथे युगांत तो घोर । साहवा लागे ॥७८७॥
तैसे होण्या आत्मज्ञान । जावे लागे अति दुःखातून । मगच आत्मतत्त्वाचे प्रकटन । होई तेथे ॥७८८॥
वैराग्यरूपी विष । जयाने गिळले निःशेष । तेथेच आत्मतत्त्व खास । प्रकटते अर्जुना ॥७८९॥
जसं त्या द्राक्षानं । आरंभी आंबट असणं । पण गोड ती लागणं । पक्व होता ॥७९०॥
ते वैराग्यदिक तैसे । पिकलिया आत्मप्रकाशे । अर्जुना अविद्या नाशे । वैराग्याकारण ॥७९१॥
गंगा भेटे सागरास । तैसे होता आत्मतत्त्वा समरस । स्वस्वरूप ते अनुभवास । येते अर्जुना ॥७९२॥
ऐसे वैराग्याच्याकारणे । ज्या आत्मसुखाचे प्रकटणे । तयासीच सात्त्विक म्हणे । अर्जुना मी ॥७९३॥
आता राजस सुखाची कहाणी । घे अर्जुना तू ऐकूनी । सांगतो ती विस्तारुनी । आता तुजला ॥७९३॥
विषय आणि इंद्रिया । मेळ होता धनंजया । जे सुख येई उदया । ते राजसी अर्जुना ॥७९४॥
अधिकारी येता गावात । जसा उत्साह असे ओसांडत । वा विवाह तो धूमधडाक्यात । काढूनी कर्ज ॥७९५॥
जशी गोड केळी साखर । अनेक रोगांचे ते माहेर । विषयांचा हा प्रकार । तैसाच अर्जुना ॥७९६॥
ठगांची ती मैत्री । वा वेश्येसोबतच्या रात्री । खिसेकापूची ती कात्री । तैसे अर्जुना ॥७९७॥
विषय इंद्रियांच्या संयोगानं । आभास सुखाचा होणं । तो क्षणिक भ्रम जाण । अर्जुना तू ॥७९८॥
विषय इंद्रिय सुटता । अनुभवा येते दुःखता । विषादाचाच तो राबता । तयाच्या मनी ॥७९९॥
आणि भोगले जे काही । ते स्वप्नाप्रमाणे नाहीसे होई । मग तडपणेच राही । नशिबी त्याच्या ॥८००॥
ऐसे इहलोकी दुःख देऊन । परलोकही विषारी होणं । ते सुख अर्जुना जाण । राजसी तू ॥८०१॥
लागता इंद्रियांचा लळा । पिकतो अधर्माचा मळा । तैसे भोगाचा सोहळा । अकल्याणकारी ॥८०२॥
ऐसे हे पातकांचे घर । जेथे नरकाचाच वावर । मग दुःख ते अपार । जन्मोजन्मी ॥८०३॥
विषासी नाम मधुर । पण प्राणघातक फार । तैसे राजसी सुखाचा प्रकार । आहे अर्जुना ॥८०४॥
ऐसे राजसी जे सुख । अर्जुना तेच आहे दुःख । म्हणून न करावी जवळीक । तयाशी कधी ॥८०५॥
आता तामसी सुखाचे वर्णन । घे अर्जुना तू ऐकून । दे बा ते अवधान । बोलासी माझ्या ॥८०५॥
निषिद्ध ते प्याल्याने । वा अखाद्य ते खाल्ल्याने । प्राप्त जे वेश्यागमने । ते तामसी अर्जुना ॥८०६॥
दुसऱ्यास ठार मारून । परधनाचा अपहार करून । खोट्या स्तुतीनं सुखावणं । तामसी अर्जुना ॥८०७॥
आळस जे वाढवते । सदैव निद्रित ते ठेवते । आणि भ्रम उत्पन्न करते । सत्याविषयी ॥८०८॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ते गा सुख पार्था । तामसी जाण सर्वथा । तामसी सुखाची वार्ता । पाप आहे ॥८०९॥
ऐसे कर्मभेदाकारण । फळही त्रिविध असणं । तयाचे ते वर्णन । ऐकलेस तू ॥८१०॥
कर्म कर्ता कर्मफळ । येथे त्रिपुटीच अर्जुना केवळ । जन्ममरणाचा हा घोळ । त्रिपुटीकारणे ॥८११॥
जैसे त्या तंतूपासून । वस्त्राचे होते निर्माण । तैसे विश्वाचे प्रकटन । त्रिगुणाकारणे ॥८१२॥
अर्जुना या त्रिगुणांच्यावीण । नाहीच अस्तित्व जाण । त्रिगुणाचीच ती खाण । अस्तित्व आहे ॥८१३॥
जसं लोकरीवीण कांबळ । मातीशिवाय ते ढेकूळ । उष्णतेवीण तो जाळ । आहे का कोठे ॥८१४॥
तैसे या त्रिगुणावीना । नाहीच सृष्टीची रचना । या सत्यास बा अर्जुना । जाणावे आधी ॥८१५॥
विश्व हे सकळ । तीन गुणांचाच घोळ । बाब ही निखळ । आहे अर्जुना ॥८१६॥
ते मुख्य देव तीन । आणि त्रैलोक्याचं रहाटणं । आणि प्रकटला तो चातुर्वर्ण । त्रिगुणाकारणे ॥८१७॥
तोचि चारी वर्ण । पुससी जरी कोण कोण । तयात तो ब्राह्मण । मुख्य की ॥८१८॥
क्षत्रिय वैश्य हे जाण । ब्राह्मणांच्याच बा समान । वेदोक्त विधिविधान । अधिकार त्यांचा ॥८२०॥
चौथा शूद्र जो धनंजया । वेद अधिकार नाही तया । जो आहे अवंलबून या । वर्णत्रयी ॥८२०॥
जो वृत्तीचा जरी पतित । पण इतर तिघांच्या संबंधित । म्हणून तोही वर्णविभागात । समाविष्ट झाला ॥८२१॥
जसे फुलांच्या त्या संगतीनं । दोराही करावा लागे धारण । तैसे शूद्रासी स्वीकारणं । श्रुतीने अर्जुना ॥८२२॥
ऐसी गा ही पार्था । आहे चातुर्वर्ण व्यवस्था । त्यांच्या कर्म विभागणीची कथा । ऐकावी आता ॥८२३॥
हे गुण वर्ण चारी । फिरती जन्म-मृत्यूच्या भोवरी । क्वचितच अर्जुना ईश्वरी । पैठा करती ॥८२४॥
ज्या गुणांच्याच कारण । प्रकटले हे चार वर्ण । त्या गुणांनुसार कर्म करणं । नशिबी त्यांच्या ॥८२५॥
पूर्वसंस्काराकारण । प्रकटती हे गुण । या गुणांप्रमाणे वागणं । अनिवार्य की ॥८२६॥
तयांच्या गुणानुसार । घडती कर्मांचे व्यवहार । म्हणून चातुर्वर्णाचा प्रकार । प्रकटला येथे ॥८२७॥
वाटून सत्त्व रज समान । केले क्षत्रिय आणि ब्राह्मण । तयांची कर्मे घडणं । तैसीच मग ॥८२८॥
रजात सात्त्विक मिसळता । तो वैश्यलोकांचा राबता । रजात तमाची वार्ता । ते शूद्र गा ॥८२९॥
ऐसा एकचि असूनि प्राणी । चार्तुवर्णात झाली विभागणी । गुणांचीच ही कहाणी । आहे अर्जुना ॥८३०॥
आपल्याच गुणाप्रमाणं । अर्जुना येथे कर्मांचं प्रकटन । गुण कर्म अभिन्न । असती अर्जुना ॥८३१॥
चारही वर्णांची लक्षणं । आता करतो मी वर्णन । लक्ष ते देऊन । ऐकावे आता ॥८३२॥
कैसा असे तो ब्राह्मण । काय तयाचे गुण । ते घ्यावे अर्जुना समजावून । आता तू ॥८३२॥
सर्वेंद्रियांच्या त्या वृत्ती । घेऊनिया आपुल्या हाती । बुद्धी आत्मयासी एकांती । मिळे जैसी ॥८३३॥
ऐसा बुद्धीचा उपक्रम । तया नाम शम । सात्त्विक वृत्ती जी तमाम । आहे अर्जुना ॥८३४॥
बाह्येंद्रिया नियमून । शास्त्र विधि पाळून । टाळणे ते अधर्माचरण । दम आहे ॥८३५॥
शमा मदत करणं । हा दमाचा तो गुण । मग स्वधर्माचे आचरण । घडे तेथे ॥८३६॥
सटवीच्या त्या राती । खोली प्रकाशित ठेवती । तैसे ईश्वरस्मरण चित्ती । तप आहे ॥८३७॥
तया नाम तप । जे तिसऱ्या गुणाचे रूप । तेथे शौचही निष्पाप । अंतर्बाह्य ॥८३८॥
मन भावशुद्धी भरले । सात्त्विक क्रिये अंगीकारीले । ऐसे आत बाहेर चांगले । असणे जे का ॥८३९॥
तया नाम शौच पार्था । आहे कर्मगुण जो चौथा । पृथ्वीप्रमाणे बा सर्वथा । सहनशील जो ॥८४०॥
ते गा क्षमा पांडवा । गुण येथे पाचवा । तो स्वरांमाजी असावा । पंचमू जैसा ॥८४१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

नदी वाकडी जरी वाहे । परि समुद्राकडेच जाये । जशी गोडी उसांत राहे । ठासून अर्जुना ॥८४२॥
पडे विषम जरी जीवा । पण कल्याणकारी बरवा । तो आर्जव गा सहावा । गुण येथे ॥८४३॥
जसे त्या माळ्याने । झाडांसी पाणी देणे । मग फळ ते प्राप्त होणे । अनिवार्य की ॥८४४॥
तैसे शास्त्र विधि आचरुन । ईश्वरा एकरूप होणं । हे ध्येय जे असणं । ते ज्ञान गा ॥८४५॥
ज्ञानाची ऐसी जाण । अर्जुना सातवा तो गुण । आता पाहूया विज्ञान । काय आहे ॥८४६॥
सात्त्विक जे मन । तयाने करता ते ध्यान । ईश्वरत्वी एकरूप होणं । विज्ञान की ॥८४७॥
हे विज्ञान बरवे । गुणरत्न जे आठवे । आणि आस्तिक्य जाणावे । गुण नववा ॥८४८॥
राजमुद्रा ती लागता । पदार्था चलनाची योग्यता । तैसे शास्त्रा देणे मान्यता । आस्तिक्य आहे ॥८४९॥
आदरे जे का मानणे । ते आस्तिक्य मी म्हणे । तो नववा गुण जाणणे । अर्जुना तू ॥८५०॥
एवं नवही शमादिक । गुण जे सकळीक । ते कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचे ॥८५१॥
ऐशा नवगुणांची खाण । अर्जुना आहे ब्राह्मण । तो स्वयंप्रकाशी जाण । सूर्य जैसा ॥८५२॥
चाफा-चाफ्याने पूजिला । चंद्र स्वप्रकाशे उजळला । स्वयेचि सुवासीत जाहला । चंदन जैसा ॥८५३॥
ऐसे गुण करून धारण । कर्म करे ब्राह्मण । मग तया आत्मज्ञान । दूर कैचे ॥८५४॥
आता जे क्षत्रियाचे । कर्म अर्जुना साचे । वर्णन ते तयाचे । ऐकावे आता ॥८५५॥
जसा तो प्रभाकर । नाही अवलंबून कोणावर । वा जसे साहस ते अपार । सिंहाठायी ॥८५६॥
असा जो स्वत:हून । अर्जुना जो हिंमतवान । ओळखावा तो गुण । शौर्य म्हणून ॥८५७॥
जसा सूर्य तो उगवता । नक्षत्रे जाती अस्ता । तैसा शौर्याचा राबता । क्षत्रियाठायी ॥८५८॥
आपुलिया उत्तम गुणे । जगा चकीत करणे । मनी भ्रांती नसणे । तेज आहे ॥८५९॥
ऐसा भ्रांतीच्या पार । तो तेजाचा प्रकार । आहे गुण तो धीर । तिसरा अर्जुना ॥८६०॥
पडले जरी आकाश । तरी भीतीचा नाही लवलेश । ऐशा मनाच्या त्या वृत्तीस । धीर म्हणती ॥८६१॥
पाणी कितीही असो अफाट । त्यावर कमळ पाने पसरतात । जसं आकाश ते वर असतं । कशाच्याही ॥८६२॥
कोणताही प्रसंग गुदरला । तरी जो स्थिर राहिला । म्हणती या गुणाला । दक्षत्व अर्जुना ॥८६३॥
ते दक्षत्व गा चोख । जो गुण चौथा देख । आणि झुंज अलौकिक । गुण पाचवा ॥८६४॥
जशी सूर्यफुलाची झाडे । सदा सन्मुख सूर्यापुढे । तैसा हा शत्रूपुढे । तयार युद्धा ॥८६५॥
कोणत्याही प्रसंगा त्याने । धीटपणे सामोरे जाणे । समरांगणी पाठ दाखवणे । न ठाऊक तया ॥८६६॥
हा क्षात्रवृत्तीतील पाचवा गुण । श्रेष्ठ अर्जुना सामर्थ्यवान । जशी चार पुरुषार्थाहून । श्रेष्ठ ती भक्ती ॥८६७॥
जसे त्या वृक्षाने । फुलेफळे मुक्तपणे वाटणे । त्या गुणासी मी म्हणे । उदारत्व अर्जुना ॥८६८॥
जसे चंद्राचे चांदणे । घेणाऱ्याने इच्छेप्रमाणे घेणे । तैसे याने नाही न म्हणणे । मागितल्या कोणी ॥८६९॥
ऐसे अर्जुना दान । तयाचा सहावा गुण । विशाल हृदयाचं असणं । तयाचे ठायी ॥८७०॥
पोषुनी अवयव आपुले । मग तयांचे भोग भोगले । तैसे वैभव त्याने वाढवले । भोगासाठी ॥८७१॥
त्यासी नाम ईश्वरभावो । जो सर्वसामर्थ्याचा ठावो । तो गुणामाजी रावो । सातवा येथे ॥८७२॥
ऐसे गुण ते सात । तयाने केले आत्मसात । जसे शोभती त्या आकाशात । सप्तर्षी अर्जुना ॥८७३॥
ऐसे सात गुण । जयाच्या अंतरी असणं । तोच अर्जुना जाण । क्षत्रिय तू ॥८७४॥
क्षत्रिय नव्हे सामान्य नर । तो सात्त्विकतेचाही आगर । म्हणून मोक्षाचेही द्वार । खुले त्याला ॥८७५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसा सप्तगुणांनी युक्त । तो पृथ्वी असे भोगत । अखिल ती सुखजात । अंकित त्याच्या ॥८७६॥
ऐसे हे सात गुण । जशी गंगाच केली धारण । ऐसा सागराहून महान । क्षत्रिय अर्जुना ॥८७७॥
हे शौर्यादि गुण । क्षत्रिया नैसर्गिक जाण । मग तैसेच कर्म घडणं । अनिवार्य की ॥८७८॥
आता वैश्याचिये जाती । जे उचित कर्मे असती । तयाची कथा ती । ऐकावी पुढे ॥८७९॥
भूमी बीज नांगर । हाच जयाचा आधार । करणे तो व्यापार । वैश्य वृत्ती ॥८८०॥
शेती करून जगणे । गाई म्हशी पाळणे । व्यापार तो करणे । आवडे तया ॥८८१॥
ऐसे जयांचे जीवन । तया वैश्य तू जाण । वैश्यांचे ते गुण । ऐकलेस तू ॥८८२॥
वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । हे तीन बा द्विजवर्ण । तयांची सेवा करणं । कर्म शूद्रांचे ॥८८३॥
ऐसे आपुल्या गुणाप्रमाणे । जिवाने कर्म करणे । तया मी चातुर्वर्ण म्हणे । अर्जुना माझ्या ॥८८४॥
इंद्रियांचे ते जैसे । कर्म ठरलेले असे । चातुर्वर्णाचेही तैसे । ठरलेलेच की ॥८८५॥
जसे ढगातून पडणाऱ्या पावसाने । नदीमार्गे सागरी जाणे । तैसे वर्णाप्रमाणे कर्म करणे । मोक्षदायी ॥८८६॥
ऐसे वर्णाश्रमवशे । जे करणीय आले असे । ते होऊ देणे आपैसे । कल्याणकारी ॥८८७॥
तो गहन कर्मसिद्धांत जाणून । त्याप्रमाणे कर्म करणं । त्यातच आहे कल्याण । अर्जुना माझ्या ॥८८८॥
आपल्या मालकीचे रत्न । घ्यावे जोहऱ्याकडून पारखून । तैसे कर्मसिद्धांत जाणून । करावे कर्म ॥८८९॥
जशी दृष्टी आहे आपलेठायी । पण प्रकाशावीण दिसत नाही । तैसे कर्मसमजेवीण नाही । मुक्ती अर्जुना ॥८९०॥
म्हणून आपल्या गुणानुसार । जो आपला असे अधिकार । त्यानुसारच कर्मव्यवहार । कल्याणकारी ॥८९१॥
आपल्याच घरातील ठेवा । दाखवू शके जर दिवा । तर तो घेण्यात पांडवा । कल्याणच की ॥८९२॥
तैसे स्वभावे नशिबी आले । जैसे शास्त्रात आहे वर्णिले । ते विहित कर्म आपुले । आचरावे अर्जुना ॥८९३॥
आळस तो सांडुनी । फलेच्छा ती टाकूनी । मन प्राण अर्पूनी । करावे कर्म ॥८९४॥
पाणी पडता प्रवाहात । पाण्यासोबतच असे वाहत । तैसे विहित कर्म करत । रमावे कर्मी ॥८९५॥
अर्जुना जो यापरी । ते विहित कर्म करी । तो मोक्षाच्या द्वारी । ठाके उभा ॥८९६॥
जे अकरणीय आणि निषिद्ध । वाढवी अर्जुना भवबंध । तयाचा घेऊनी वेध । टाळे तया ॥८९७॥
काम्य कर्म नसे इच्छित । कर्मकांडी नसे अडकत ।स्वर्ग भोगादि नसती आवडत । तयाला अर्जुना ॥८९८॥
आपले नित्य कर्म तो । फलेच्छा त्यागून करतो । म्हणून मोक्षास पात्र तो । आपोआप ॥८९९॥
ऐसी शुभाशुभाची कल्पना । पापपुण्याची ती धारणा । खुंटता अहं अर्जुना । मोक्ष घडे ॥९००॥
क्षण जो सकळ भाग्याचा । लाभ देण्या बा मोक्षाचा । उद्‌भव तो वैराग्याचा । कल्याणदायी ॥९०१॥
ऐसे वैराग्य होणे प्राप्त । तीच कल्याणाची बरसात । वैराग्य प्रकटणे अंतरात । मुक्तिदायी ॥९०२॥
जी सांगे आत्मज्ञानाची वार्ता । तीच ही वैराग्यता । आत्मज्ञान ते आता । दूर नाही ॥९०३॥
किंबहुना आत्मज्ञान । जेणेकारणे प्राप्त होणं । ते वैराग्यरुपी अंजन । लाभले तया ॥९०४॥
ऐसी मोक्षाची योग्यता । लाभे तया पांडुसुता । विहित कर्म अनुसरता । वैराग्यप्राप्ती ॥९०५॥
हे विहित कर्म पांडवा । आपल्या कल्याणाचा ठेवा । आणि हीच बा परमसेवा । मज सर्वात्मकाची ॥९०६॥
जैसे त्या प्रतिव्रतेने । पतीसंगे भोग भोगणे । तेच तिचे तप असणे । तैसे अर्जुना ॥९०७॥
जसे त्या बालकास । केवळ मातेचाच ध्यास । तैसी तळमळ असणे खास । मुक्तिदायी ॥९०८॥
जसे त्या माशानं । गंगेत अर्जुना राहून । सर्व पुण्यप्राप्त करणं । तैसे अर्जुना ॥९०९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तैसे आपुले विहित । अर्जुना कर्म ते करत । वैराग्यासी बा प्राप्त । व्हावे अर्जुना ॥९१०॥
फलेच्छा ती टाकून । विहित कर्म करून । वैराग्य प्राप्त होणं । सूत्र आहे ॥९११॥
जसं निःस्वार्थाकारण दासीनं । घराची घरधनीण बनणं । तैसे फलेच्छा टाकणं । कल्याणकारी ॥९१२॥
ऐसे फलेच्छारहित कर्म । तोच अर्जुना धर्म । धर्माचे ते वर्म । जाणावे आधी ॥९१३॥
म्हणोनी विहित क्रिया केली । ती तयाची आज्ञा पाळीली । जयापासून निर्माण झाली । सृष्टी अर्जुना ॥९१४॥
अविद्येच्या त्या कारण । येथे जीवभावाचं भासणं । मग त्रिगुणाचंच रहाटणं । चाले येथे ॥९१५॥
या विश्वाचे ठिकाणी । समस्त ब्रह्मच आहे भरुनी । जैसे दीपाच्या ठिकाणी । तेज आहे ॥९१६॥
स्वकर्मकुसुमांनी वीरा । पूजा करता ईश्वरा । आनंद होय अपारा । तयाच्या अंतरी ॥९१७॥
ऐसी पूजा ती करता । प्रसन्न आत्मतत्त्व होता । मग वैराग्याची सिद्धता । आपैसी की ॥९१८॥
आत्मज्ञानाच्या तळमळीकारण । होता वैराग्याचे प्रकटन । विश्व वमनासमान । वाटते अर्जुना ॥९१९॥
जसे पतीच्या विरहाकारण । विरहिणीस नको वाटणं जिणं । तैसे इंद्रिये आणि मन । नावडे तया ॥९२०॥
जरी अजून न झाले ज्ञान । पण ज्ञानाच्या तळमळीकारण । आत्मज्ञाना पात्र होणं । तयाने अर्जुना ॥९२१॥
म्हणून प्राप्त होण्या आत्मज्ञान । करावे स्वधर्माचेच आचरण । स्वकर्मीच मोक्ष प्रकटन । घडे अर्जुना ॥९२२॥
आपला हा स्वधर्म । आचरणी जरी विषम । पण अंती तयाचा परिणाम । मोक्षदायी ॥९२३॥
अर्जुना स्वतःच्या आरोग्याला । आवश्यक जर कडुनिंबपाला । मग तयाच्या कडूपणाला । कंटाळणे नाही ॥९२४॥
केळीच्या फलधारणेस । खूपच लागती दिवस । म्हणून केळीचे झाड तोडल्यास । न मिळे केळी ॥९२५॥
तैसे स्वधर्म मानला कठीण । मग मोक्ष नक्कीच दुरावणं । केवढे अर्जुना नुकसान । होईल मग ॥९२६॥
आपली ती माय । अर्जुना कुबडी जरी होय । तिजवरील प्रेम काय । कुबडे कधी ॥९२७॥
इतर त्या स्त्रिया । जरी रंभेहून बरविया । पण कामाच्या नाही त्या । बालकासाठी ॥९२८॥
अर्जुना खूप पाण्याहून । तूप आहे गुणवान । पण माशाने त्यात जगणं । शक्य का कधी ॥९२९॥
आघविया जगा जे विख । ते विख किडीया पीयूख । आणि जगा गूळ तो देख । मरण तया ॥९३०॥
म्हणोनी विहित कर्म करणे । मग फिटे संसाराचे धरणे । क्रिया कठोर तरी तेणे । कल्याण होई ॥९३१॥
परक्याचा आचार अवलंबणे । ते जैसे डोक्याने चालणे । मग अकल्याणच होणे । तयाने अर्जुना ॥९३२॥
यालागी कर्म आपुले । जन्मासोबत जे आले । जर फलेच्छा टाकून केले । तर कल्याणदायी ॥९३३॥
म्हणून स्वधर्मच पाळावा । परधर्म तो टाळावा । ऐसा नियम ठेवावा । अर्जुना तू ॥९३४॥
जोवरी त्या आत्मज्ञाना । न प्राप्त होशी तू अर्जुना । तोवरी स्वधर्म आचरणा । सोडावे ना कधी ॥९३५॥
कोणतेही कर्म करता । आहे कष्टाचीच वार्ता । मग स्वधर्मीचा राबता । योग्य की ॥९३६॥
सरळ वाटेने चालावे । तरी पायच शिणवावे । आणि आडराने धावावे । तरी दमती पाय ॥९३७॥
संगे नेणे दगड वा शिदोरी । भारच काहीही नेले तरी । मग का न घ्यावी शिदोरी । सोबत अर्जुना ॥९३८॥
दाणे वा भुसा कांडणे । दोहोठायी श्रम लागणे । मग दाणेच ते कुटणे । कल्याणकारी ॥९३९॥
वाळू वा तीळ गाळणे । अर्जुना ते कष्टप्रदच असणे । मग तीळच ते गाळणे । नव्हे का योग्य ॥९४०॥
होम वा चुलीकारणे । अग्नी लागे तो फुंकणे । ते दोहो ठिकाणी त्रास असणे । तैसे अर्जुना ॥९४१॥
धर्मपत्नी ती सांभाळणे । त्यासाठी खर्च तो लागणे । मग चूक वेश्येस पोसणे । तैसे अर्जुना ॥९४२॥
रणांगणी पाठ दाखवणं । तेथे न चुकेच ते मरण । मग घाव समोरून झेलणं । योग्य जैसे ॥९४३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मारास्तव पतीघर सोडणे । परघरीही मार न चुकणे । मग स्वपतीस ते सोडणे । वायाचि की ॥९४४॥
स्वत:सी जे आवडणे । तेथेही कष्टचि लागणे । म्हणून विहित कर्म करणे । सुखदायी अर्जुना ॥९४५॥
जयाच्या त्या कारणे । अमरत्वाचा लाभ होणे । त्यासाठी सर्वस्वही वेचणे । कल्याणकारी ॥९४६॥
ज्या कर्माच्या कारणे । भवचक्रीच ते अडकणे । कां कर्म तैसे करणे । उगीच अर्जुना ॥९४७॥
इंद्रियांच्या नादी लागून । करणे आयुष्याची धूळधाण । ते पापचि करणं । अर्जुना माझ्या ॥९४८॥
म्हणोनी करावा स्वधर्म । सोडून ते अकारण श्रम । मग पुरुष तो परम । भेटतो अर्जुना ॥९४९॥
याकारणे बा किरीटी । चालावी स्वधर्माचीच पाऊटी । जैसे न विसरणं संकटी । सिद्धमंत्रा ॥९५०॥
नाव उपयोगी सागरात । वा दिव्यौषधी ती महारोगात । तैसे स्वधर्म आचरत । व्हावे मुक्त ॥९५१॥
ऐसे स्वधर्म जे आचरती । तयांचे रज तम संपती । मग सत्त्वात प्रस्थापित होती । अर्जुना ते ॥९५२॥
मग सात्त्विकतेच्या कारण । स्वर्गसुख विष वाटून । आत्मज्ञानाची ती तहान । प्रकटते तेथे ॥९५३॥
ऐसे वैराग्य ते प्रकटून । बदलते अर्जुना आचरण । त्या वैराग्याचं लाभणं । कल्याणकारी ॥९५४॥
ऐसा वैराग्याकारणे । कैसे तयाचे वागणे । ते आता विस्तृतपणे । ऐकावे अर्जुना ॥९५५॥
जसा त्या जाळ्यात । वारा नाही बा सापडत । तैसा देह मनइंद्रियात । न अडके तो ॥९५६॥
परिपक्वतेच्या वेळेस । देठ धरू शके न फळास । सोडे तो इंद्रिय मनास । तैसे अर्जुना ॥९५७॥
जशी मैत्री विषाची । न ती कोणाच्या कल्याणाची । तैसे आसक्ती देहमनाची । सोडली त्याने ॥९५८॥
त्या विषयांच्या कारण । वीट तया येऊन । एकांत करतसे ग्रहण । अर्जुना तो ॥९५९॥
ऐसे ते वैराग्यपण । अंतर्बाह्य प्रकटल्या कारण । विषयांकडे त्याचे मन । न जाये कधी ॥९६०॥
आत्मज्ञानाच्या जिज्ञासेकारण । वैराग्य करून धारण । आत्मतत्त्वाचे अनुसंधान । अंतरी त्याच्या ॥९६१॥
ऐसे वैराग्याकारण । वासनाच जाते शमून । आग जशी मातीनं । विझते अर्जुना ॥९६२॥
ऐसी वासनेचे शमनं । ते भाग्याचं लक्षण । ऐसे ज्ञाना पात्र होणं । तयाने अर्जुना ॥९६३॥
आता द्वैतभाव सरून । अद्वैता प्राप्त होऊन । जाई ब्रह्मच होऊन । जीव त्याचा ॥९६४॥
मग प्रारब्ध बा तयाचे । अर्जुना सरून जाते । आणि नवकर्म न उपजते । तयाच्या ठायी ॥९६५॥
ऐसी कर्म साम्यदशा । होय तेथे वीरेशा । मग श्रीगुरू आपैसा । भेटे तया ॥९६६॥
सरता रात्रीचे प्रहर । मग दूर होतो अंधार । उगवता तो दिनकर । जैसा अर्जुना ॥९६७॥
काढता केळीचा घड । अर्जुना वाळते केळीचे झाड । तैशी अविद्या ती द्वाड । नासूनी जाये ॥९६८॥
जैसे येता ती पौर्णिमा । अपूर्णता सांडी चंद्रमा । तैसे होय वीरोत्तमा । गुरूकृपा तया ॥९६९॥
जे काही अज्ञान असे । ते त्या गुरूकृपे नासे । सूर्योदयासवे जैसे । नासे अंधार ॥९७०॥
तैसे अविद्येचिये कुशी । कर्म कर्ता कार्य ऐशी । ती त्रिपुटीच अर्जुना आपैसी । मरुनी जाय ॥९७१॥
अविद्येचा संपूर्ण होऊन नाश । तुटे जन्ममरणाचा भास । तयाचेच नाव संन्यास । अर्जुना माझ्या ॥९७२॥
समूळ कर्माचा नाश होता । द्वैताचा संपतो पत्ता । मग अनुभवणाराच तत्त्वत: । ब्रह्म होई ॥९७३॥
स्वप्नातून जागे होता । समजते स्वप्नाची व्यर्थता । तैसे अनुभवता ब्रह्ममयता । सरे द्वैत ॥९७४॥
ऐसे सरता ते अज्ञान । अर्जुना दु:ख जाते संपून । ज्ञाता ज्ञेयाचा अंत होऊन । ज्ञानचि तो ॥९७५॥
अर्जुना बा वीरेशा । दूर करता प्रतिबिंबासह आरसा । पाहतेवीण तो जैसा । पाहता ठाके ॥९७६॥
तैसे द्वैत ते जाता । संपून जातो तो जाणता । आणि केवळ ब्रह्ममयता । उरे तेथे ॥९७७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तेथे स्वभावे धनंजया । नाही कोणतीच क्रिया । म्हणून प्रवादू तया । नैष्कर्म्यु ऐसा ॥९७८॥
संपून ते पृथकपण । अर्जुना ब्रह्म ते होणं । जसे होता लाट पाण्यात लीन । समुद्र उरे ॥९७९॥
ऐसे ब्रह्ममय होणं । तीच नैष्कर्मसिद्धि जाण । सर्व सिद्धीत जी महान । सर्वांहून ॥९८०॥
जसा देवळाचा कळस । किंवा गंगेचा सिंधुप्रवेश । वा सोन्याचा सोळावा कस । तैसे अर्जुना ॥९८१॥
आपले जाणणे नेणणे । अर्जुना ते द्वैतचि असणे । ते समूळ सरूनी जाणे । ज्ञान आहे ॥९८२॥
ऐसे ब्रह्ममय होणं । अर्जुना तेचि बा ज्ञान । सर्व सिद्धीत महान । परमसिद्धी ॥९८३॥
अर्जुना गुरुकृपा होता । लाभते ही ब्रह्ममयता । विरळ्यासच बा प्राप्तता । तियेचि अर्जुना ॥९८४॥
अर्जुना उगवता दिनकर । संपतो अंधाराचा प्रकार । जसा दीपच होतो कापूर । अग्निस्पर्शे ॥९८५॥
जसा मिठाचा तो कण । तया पाण्याचा स्पर्श होणं । मग पाणीच होऊन जाणं । तयाने अर्जुना ॥९८६॥
जसे उठता झोपेतून । घडे स्वप्नाचं ते संपणं । तसे संपते पृथकपण । ज्ञान होता ॥९८७॥
नशिबाच्या त्याकारणे । गुरुवाक्य कानी पडणे । मग द्वैतच संपून जाणे । अनायासे ॥९८८॥
तयासी मग कर्म करणे । अर्जुना ही भाषा न उरणे । जसे आकाशा उपजणे नाशणे । नाही कधी ॥९८९॥
आता घे अर्जुना जाणून । कैसे ब्रह्ममय होणं । शुद्ध सात्त्विक ते मन । असावे आधी ॥९९०॥
शुद्ध सात्त्विक नसता मन । अर्जुना ब्रह्ममयता कठीण । अशुद्धीस ते गुरुवचन । न उमजे कधी ॥९९१॥
एऱ्हवी स्वकर्माच्या अग्नीत । काम्य निषिद्ध जाळत । रज तमासी संपवत । सिद्ध तो ॥९९२॥
धन पुत्र स्वर्गाची वासना । नच ये जयाच्या मना । मग पात्र बा अर्जुना । ज्ञानासी तो ॥९९३॥
संपून इंद्रियांचे स्वैरपण । अंतरी प्रकटले वैराग्य धन । तेच प्रत्याहाराचं प्रकटन । आहे अर्जुना ॥९९४॥
तेणे स्वधर्माचे फळ । ईश्वरा अर्पूनी सकळ । वैराग्यपद ते अढळ । प्राप्त केले ॥९९५॥
ऐसी आत्मसाक्षात्कारी । स्थिती अर्जुना जी जरुरी । ती सामग्री सर्व पुरी । मेळविली त्याने ॥९९६॥
अर्जुना त्याच समयी । सद्‌गुरु भेटले पाही । आणि सांगितला बा तयानीही । आत्मबोध ॥९९७॥
पण औषध घेतल्याक्षणी । न जाई आजार संपूनी । जसा सूर्य उगवल्याक्षणी । नाही दुपार ॥९९८॥
जमीन सुपीक आणि चांगली । भूमीत पेरणीही केली । पण फलप्राप्ती ती झाली । कालानेच की ॥९९९॥
लाभले मन निर्मळ । सोबती सद्‌गुरुचा मेळ । पण लागेच अर्जुना वेळ । ज्ञान होण्या ॥१०००॥
तैसा वैराग्यलाभ झाला । वरी सद्‌गुरुही भेटला । जिवासी अंकुर फुटला । विवेकाचा ॥१००१॥
येथे केवळ ब्रह्माचीच वस्ती । बाकी अवघीच भ्रांती । ऐसी दृढ प्रचीती । अंतरी आली ॥१००२॥
अनुभवून ब्रह्ममयता अर्जुना । तो प्राप्त झाला ज्ञाना । मग अंतरी त्या कामना । नुरती येथे ॥१००३॥
जागृति स्वप्न सुषुप्ति । होता तिन्ही अवस्थांची समाप्ती । ज्ञानास त्या मिठी । पडेल अर्जुना ॥१००४॥
ऐक्याचे एकपण सरे । तेथे आनंदकणही विरे । काहींचि नुरोनि उरे । जे काही गा ॥१००५॥
ब्रह्मी एकता पावून । ब्रह्मचि होऊन जाणं । जी जाणिवेचीच खाण । अर्जुना माझ्या ॥१००६॥
अर्जुना भुकेलेल्यास । वाढता अन्न षडरस । तृप्ती प्रतिघासास । लाहे जेवि ॥१००७॥
तैसे विवेकाच्याकारणे । वैराग्य ते प्रकटणे । मग आत्मज्ञान होणे । अनिवार्य की ॥१००८॥
ऐसे हे आत्मज्ञान । कैसे तया ते पावणं । ते आता सर्व ऐकून । घ्यावे तू अर्जुना ॥१००९॥
ज्या क्रमाने ब्रह्म । अर्जुना तया सुगम । त्या क्रमाचे ते वर्म । ऐकावे आता ॥१०१०॥
गुरुंनी जी वाट दाविली । विवेके तेणे चोखाळली । ऐसी मलिनता गेली । बुद्धीची त्याच्या ॥१०११॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अवधान गुढी उभारली । नि गुरुवाक्ये ती ऐकली । ऐसी बुद्धी शुद्ध केली । तयाने अर्जुना ॥१०१२॥
सांडुनी कुळे दोन्ही । पतीसी अनुसरे कामिनी । तैसा तो आत्मचिंतनी । जाहला दंग ॥१०१३॥
ज्ञानाच्या ओढीकारण । मनासी तादात्म्य तुटून । होते वैराग्याचे प्रकटन । तयाच्या अंतरी ॥१०१४॥
मग पाचही इंद्रियांची गती । लयास जाते अर्जुना ती । मग ओढ विषयांच्या प्रति । राहीच ना ॥१०१५॥
जसे खाता विषारी अन्न । अर्जुना हितकारी बा वमन । तैसे विषयांसी त्यागणं । तयाने अर्जुना ॥१०१६॥
मग अंतर्मुख ते होऊन । तयाने मनही शुद्ध करणं । ऐसे सात्त्विक बा होणं । अंतर त्याचे ॥१०१७॥
ऐशा सात्त्विकतेकारणा । तो प्राप्त शुद्ध आचरणा । मग बा ती योगधारणा । ध्येय त्याचे ॥१०१८॥
अर्जुना प्रारब्धाच्या कारण । होई जे भोगांचे प्रकटन । ते तटस्थ बा राहून । भोगले त्याने ॥१०१९॥
कल्पना आणि वासना । टाकून त्या अर्जुना । स्थितप्रज्ञतेच्या गगना । शोधले त्याने ॥१०२०॥
ऐसे इष्टानिष्ट त्यजून । रागद्वेष ते सोडून । गिरीकपारी ते राहणं । तयाने अर्जुना ॥१०२१॥
वर्दळीचे ते स्थान सोडून । अर्जुना सेवतसे तो वन । केवळ इंद्रिय आणि मन । सोबती त्याचे ॥१०२२॥
शम दम बा पाळणे । मौन तयाचे बोलणे । अंतरी चिंतन करणे । स्वभाव त्याचा ॥१०२३॥
अंगी बळ यावे । जिभेचे चोचले पुरवावे । इंद्रिया भोग भोगवावे । न वाटे तया ॥१०२४॥
करून अल्प भोजन । संतुष्ट तयानं राहणं । सदैव समतेत मन । तयाचे अर्जुना ॥१०२५॥
जिवंत राहील तन । इतकेच अन्न खाणं । जिभेसी तादात्म्य नसणं । तयाचे अर्जुना ॥१०२६॥
परपुरुषाने बोलवता । कधी न जाते पतिव्रता । तैसे निद्रा आळसाची कथा । नावडे तया ॥१०२७॥
दंडवताचे ते प्रसंगे । भूमीसी अंग लागे । मन तयाचे जागे । सदैव अर्जुना ॥१०२८॥
देहनिर्वाहापुरते । रहाटवी तो हातापायाते । इंद्रिय मन ताब्यात ते । तयाच्या अर्जुना ॥१०२९॥
आणि मनाचा उंबरा । वृत्ति न ओलांडे जरा । म्हणून वाचेच्या त्या व्यवहारा । मुकेचि तो ॥१०३०॥
ऐसे देह वाचा मानस । हे जिंकोनी बाह्यप्रदेश । तयाने आकळीले आकाश । अंतरीचे अर्जुना ॥१०३१॥
गुरुवाक्य तो जागला । बोधात जो स्थिरावला । मग निरखत निरखत झाला । ब्रह्मचि तो ॥१०३२॥
त्या दृश्याचे कारणे । अर्जुना द्रष्ट्याचे भासणे । स्वनिरीक्षणात दृश्याचे विरणे । सूत्र आहे ॥१०३३॥
अर्जुना घे समजावून । खरे हेचि बा ध्यान । द्रष्टा दृश्याचं संपणं । ध्यान आहे ॥१०३४॥
म्हणोनी तो मुमुक्षु । होता आत्मज्ञानी दक्षु । योगाभ्यासाचा पक्षु । धरतसे तो ॥१०३५॥
अर्जुना पायाच्या टाचेनं । गुद्‌मूत्रद्वार दाबून । मूळबंध तो साधणं । तयाने अर्जुना ॥१०३६॥
आकुंचूनी अध । साधूनी तिन्ही बंध । सर्व वायूंचे भेद । संपवी तो ॥१०३७॥
रागद्वेष ते सोडून । सुषुम्नेशी जागवून । कुंडलीनीचे बा जागरण । अनुभवी अंतरी ॥१०३८॥
सहस्त्राधारात जी जागली । ती मूळ बंधापर्यंत खेळविली । ऐसी कुंडलिनी अनुभवली । तयाने अर्जुना ॥१०३९॥
ऐसे निर्विकल्प होऊन । तयाने मनइंद्रिया ओलांडणं । हीच योगाची शिकवण । आहे बा अर्जुना ॥१०४०॥
ऐसा योग तो अभ्यासून । ह्याने तयार होणं । आणि मग करून ध्यान । होतसे ब्रह्म ॥१०४१॥
होण्या ते आत्मज्ञान । योग ध्यान हे दोन । तयाने घेतले अभ्यासून । अंतरी अर्जुना ॥१०४२॥
त्या वैराग्यासारखा । जोडुनी ठेविला सखा । मग त्या आत्मसुखा । विलंब कैचा ॥१०४३॥
सतत सजग राहत । अंतरी अर्जुना पाहत । स्वप्नसुषुप्ति ओलांडत । तो ब्रह्म होई ॥१०४४॥
ऐसे मोक्षाच्या क्षणी । वृत्तीच जाती संपूनी । मग तो वैराग्याचा धनी । पावे बा मोक्ष ॥१०४५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अर्जुना म्हणून वैराग्य । तेच साधकाचे भाग्य । वैराग्याकारणेच तो योग्य । आत्मलाभा ||१०४६||
त्या वैराग्याच्याकारण । आत्मज्ञाना पात्र होऊन । तयाने ब्रह्ममय होणं । अर्जुना माझ्या ||१०४७||
आणि त्या प्रवासात । ज्या अडचणी बा येतात । तया पार असे करत । विवेक त्याचा ||१०४८||
सूर्य संपवी जसा अंधार । तसा स्वप्न सुषुप्ति करे पार । मग मोक्षाचे ते द्वार । उघडेच की ||१०४९||
ज्ञानात जे आडवे आले । तया याने धोपटले । त्या अहंकारा संपविले । समूळ पहा ||१०५०||
अर्जुना हा अहंकार । अति आहे शिरजोर । जन्ममरणाचा बाजार । अहंकार की ||१०५१||
तयाचा देह जो थारा । मोडूनी घेतला तो वीरा । आणि बळ हा दुसरा । मारिला वैरी ||१०५२||
जो विषयाचेनि नावे । चौपट होऊनी धावे । जन्ममरण ते आघवे । बळाचे पोटी ||१०५३||
अहंकार विषयांचा बा पूर । जो सर्व दोषांचाच सागर । पण ध्यानरुपी तलवार । संपवी त्यासी ||१०५४||
ज्या विषयांच्याकारण । अर्जुना सुख ते वाटणं । ते विषय बा वाढवणं । आवडे तया ||१०५५||
सन्मार्ग तो भुलतो । नि अधर्मात फसतो । आणि नरकात टाकतो । स्वत:सी मग ||१०५६||
कामक्रोधास आवरता । वाढते ती अहंकारता । तपसाधन करू जाता । वाढे अहंकार ||१०५७||
क्रोधा आणि कामादिक । तो अहंकाराचाच परिपाक । वाढे क्रोध अधिकाधिक । तृप्तीअभावी ||१०५८||
जे कोणीच नाही केले । ते कामानेच बा इच्छिले । मग क्रोधासी मन आले । प्राप्ती अभावी ||१०५९||
मुळाचे तोडणे जैसे । होय का शाखोद्देशे । काम नाशलेनि नाशे । तैसा क्रोध ||१०६०||
म्हणून सांडोनी तो काम । जो जाहला बा निष्काम । तेथे क्रोधाचे काम तमाम । होतसे अर्जुना ||१०६१||
जसा सामर्थ्यवान तो । आपले ओझे दुसऱ्यावर लाटतो । तैसे परिग्रह वाढवतो । अहंकार अर्जुना ||१०६२||
जो डोक्यावर बसतो । अंगी दुर्गुण वाढवतो । नि ममत्वी अडकवतो । जिवासी अर्जुना ||१०६३||
शिष्यशास्त्रादि मिसे । मांडून आश्रमांचे फासे । गुरफटती संन्याशीही खासे । परिग्रही अर्जुना ||१०६४||
मग पत्नी पुत्रासी सोडून । वनी आश्रम तो स्थापणं । दिगंबरांनाही फसवणं । परिग्रहाने अर्जुना ||१०६५||
ऐसा दुर्दम्य जो परिग्रहो । तयाचा फेडूनी ठावो । भवविजयाचा उत्सवो । भोगीतसे जो ||१०६६||
तेथे अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणाचे जे मेळावे । त्या सर्वांनी बा यावे । सामोरे तया ||१०६७||
ऐसे सम्यक त्या ज्ञानात । अर्जुना तो असे राहत । आणि होऊनी असे जात । ज्ञानचि तो ||१०६८||
ऐसे सम्यक ज्ञानी स्थिरावून । स्वप्न सुषुप्ति ओलांडून । स्वत:च ज्ञान होणं । तयाने अर्जुना ||१०६९||
पुढे बोधाचिये कांबीवरी । सरती दृश्ये अर्जुना सारी । मग ब्रह्ममयतेची बारी । येते बा अर्जुना ||१०७०||
ऋद्धिसिद्धीच्या शक्ती । तयासी येऊनी मिळती । तरी तयाची समता ती । ढळेचि ना ||१०७१||
ऐसे ब्रह्ममय होऊन । तो होत असे आत्मवान । मग तिन्ही लोक आनंदून । जाती अर्जुना ||१०७२||
तेव्हा वैरी ना मित्र । तया ब्रह्मचि अर्जुना सर्वत्र । ऐसा स्वयेचि विश्वमात्र । होऊनी ठाके ||१०७३||
आता तो विश्वचि झाला । संपले माझे आणि मला । ऐसा अद्वितीय जाहला । अंतरामाजी ||१०७४||
जाणून एकचि सत्ता । विश्वच जाहला तत्त्वत: । मग तयासी ती ममता । लागेचि ना ||१०७५||
ऐसे जिंकणे रिपुवर्ग । आणि निरसणे हे जग । तोच अर्जुना योग । जाण बा तू ||१०७६||
वैराग्याचे चिलखत । जे घातले होते अंगात । तेही ढिले करत । सावध तो ||१०७७||
मग ध्यान करणारे मन । अर्जुना जातसे ते संपून । जीवभावाचं खंडण । होतसे तेव्हा ||१०७८||
जैसे रस औषध खरे । आपले कार्य करुनी पुरे । आपणही नुरे । होते तैसे ||१०७९||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

देखोनी मुक्कामाचे ठिकाण । पायाचा वेग कमी होणं । तैसे होण्याआधी ब्रह्मज्ञान । सुटे ती साधना ॥१०८०॥
येता त्या महासागरासी । गंगा वेग सांडी जैसी । का कामिनी कांतापासी । होततेसे स्थिर ॥१०८१॥
जैसे प्रसवता केळीचा घड । थांबते केळीची ती वाढ । तैसे विधीचं ते गाडं । थांबुनी जाई ॥१०८२॥
तैसा आत्मसाक्षात्कार । होईल देखोनि गोचर । सर्व साधन हत्यार । हळूचि ठेवी ॥१०८३॥
ऐसी ती ब्रह्ममयता । समीप अर्जुना येता । सर्व साध्य साधनता । खुंटूनी जाई ॥१०८४॥
मग वैराग्याचे फळ । अर्जुना ज्ञान जे सकळ । संपता सर्व गोंधळ । प्रकटे शांति ॥१०८५॥
ही शांति गा सुभगा । येता तयाच्या आंगा । तो ब्रह्म होआवयाजोगा । होऊनी जाई ॥१०८६॥
पौर्णिमे आधी चतुर्दशी । जितके उणेपण त्या शशी । तैसीच स्थिती काहीशी । तेथे अर्जुना ॥१०८७॥
जेव्हा गंगा असे प्रवेशत । अर्जुना त्या सागरात । तरी समुद्र जैसा शांत । तैसे अर्जुना ॥१०८८॥
ऐसी शांति ती तत्त्वत: । तीच बनते बा ब्रह्ममयता । अर्जुना ही कार्यकारणता । जाणावीस तू ॥१०८९॥
ब्रह्ममयतेचे जे रूप । प्रकटता ही शांति अमूप । ब्रह्म ते समीप । जाणावे अर्जुना ॥१०९०॥
जयाच्या अंगी ऐसी पात्रता । पुरुष मग तो पांडुसुता । अंतरी तयाच्या ब्रह्ममयता । प्रकटेच की ॥१०९१॥
जसे उष्णतेच्याकारण । अर्जुना अन्नाने ते शिजणं । मग उष्णताही निघून जाणं । तैसे अर्जुना ॥१०९२॥
जसे त्या शरद ऋतूत । नदी होत असे बा शांत । वा संपते संगीताची साथ । संपता गाणे ॥१०९३॥
थांबे आत्मबोधाचा उधम । जो अर्जुना होता श्रम । तेथेही मग तो सम । होऊनी राहे ॥१०९४॥
बा आत्मबोध म्हणून । अर्जुना ज्या स्थितीचे वर्णन । ती स्थिती अनुभवून । होतो ज्ञानी ॥१०९५॥
कोणीतरी व्हावे । काहीतरी मिळवावे । हे सरले समभावे । ज्ञान होता ॥१०९६॥
जसा उगवता दिनकर । चांदण्या होती त्या पसार । तशा मनीच्या वासना हजार । संपल्या त्याच्या ॥१०९७॥
आत्मज्ञानाकारण । जिकडेही त्याने पाहणं । ते ब्रह्मरूपच दिसणं । तयाला अर्जुना ॥१०९८॥
पाटीवरील अक्षरे । जैसी पुसता येती करे । तैसी हारपती भेदांतरे । तयाचिये दृष्टी ॥१०९९॥
<u>अर्जुना ती विपरीत ज्ञाने । सुषुप्ति जागृती आणि स्वप्ने । या सर्वांना संपवणे । अंतरी त्याने</u> ॥११००॥
ऐसे अव्यक्त ते जाणत । मग बोध वाढता वाढत । संपूर्ण बोधही समस्त । बुडोनी जाये ॥११०१॥
जैसे भोजनाच्या समयी । भूक कमी कमी होत जाई । मग तृप्तीच्या त्याठायी । नाहीच की ॥११०२॥
जसे जसे चालणे होते । उद्दिष्ट बा जवळ येते । मग वाट ती संपते । उद्दिष्ट येता ॥११०३॥
जशी जशी जागृति वाढते । निद्रा अर्जुना हारपते । जेधवा जाग पूर्ण येते । निद्राच नाही ॥११०४॥
पौर्णिमे चंद्रा पूर्णत्व भेटे । मग चंद्राची वाढ खुंटे । आणि शुक्लपक्ष मग आटे । तैसे अर्जुना ॥११०५॥
तैसे द्वैत ते संपता । प्रकटते ती अद्वैतता । मी-तूपणाची कथा । संपुनी जाई ॥११०६॥
कल्पांताची वेळ येता । मिटते नदी सागराची भेदता । तैसे द्वैत ते सरता । उरतसे ब्रह्म ॥११०७॥
अर्जुना घट तो फुटता । उरे आकाशाचीच सत्ता । आणि लाकडे ती जाळता । वन्हीच होय ॥११०८॥
जैसे सोन्याचे अलंकार । आटवता संपतसे आकार । तैसे नामरूप प्रकार । संपुनी जाती ॥११०९॥
जैसे जाग ती येता । स्वप्ने नाहीसी होता । जागृतीचीच ती सत्ता । उरे जैशी ॥१११०॥
तैसे ब्रह्ममयतेवाचून काही । अर्जुना तेथे उरत नाही । ती चौथी भक्ती पाही । माझी अर्जुना ॥११११॥
<u>इतर अर्जुना तीन । तयांची भक्ती बा भिन्न । जिच्याकारणे मी भेटणं । ती भक्ती चौथी</u> ॥१११२॥
<u>पहिली दुसरी तिसरी । ती गोष्ट नाही खरी । मजसी एकत्वाची वारी । भक्ती अर्जुना</u> ॥१११३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९९६७४८२०